पुढारी

# विद्यापीठात अण्णा भाऊ साठे यांची जयंती

कोल्हापूर : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी झाली. कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, अण्णा भाऊ साठे अध्यासनाचे प्रमुख डॉ. रणधीर शिंदे, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. धनंजय सुतार, उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर आदी उपस्थित होते.

2 AUG 2023 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अण्णा भाऊ जागतिक दर्जाचे साहित्यिक

## डॉ. बाबूराव गुरव : विद्यापीठात जयंतीनिमित्त व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : लोकशाहीर अण्णा भाऊ साठे देशाचे स्वातंत्र्य, पुरुषांचा स्वाभिमान आणि स्त्रीचे चारित्र्य जपणारे जागतिक दर्जाचे महान साहित्यिक होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. बाबूराव गुरव यांनी केले. अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि अण्णा भाऊ साठे अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने वि. स. खांडेकर भाषा भवनात 'अण्णा भाऊ साठे : वाङ्मय आणि विचारविश्व' या विषयावर गुरव यांचे व्याख्यान झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. गुरव म्हणाले, अण्णा भाऊ साठे यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते.



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. बाबूराव गुरव यांचे व्याख्यान झाले.

साहित्यिक म्हणून त्यांच्या नावावर ३० कादंबऱ्या, २३ कथासंग्रह, एक नाटक, एक प्रवास वर्णन आणि दोनशे ते अडीचशे गाणी, लावण्या आणि १५ वगनाट्ये, तमाशा आहेत. स्वातंत्र्यलढ्यामध्ये अमरावती येथे त्यांनी एक महिना तुरुंगवास भोगला होता. अण्णा भाऊ साठेंची लेखक म्हणून नोंद घेणारे शिवाजी विद्यापीठ हे राज्यातील पहिले विद्यापीठ आहे.

कुलगुरू शिर्के म्हणाले, कोणत्याही प्रकारच्या सुविधा उपलब्ध नसताना अण्णा भाऊंसारखी एखादी व्यक्ती उच्च प्रतीचे साहित्य निर्माण करू शकते, हे खूप आदर्शवत आहे. यावेळी उपकुलसचिव डॉ. उत्तम सकट, दीपक पाटील, भक्ती नाईक, शीतल पटले, अमोल देशमुख यांचा सत्कार केला. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले.

पुढारी

# अण्णा भाऊ साठे जागतिक दर्जाचे साहित्यिक

## डॉ. बाबुराव गुरव; जयंतीनिमित्त विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे देशाचे स्वातंत्र्य, पुरुषांचा स्वाभिमान व स्त्रीचे चारित्र्य जपणारे जागतिक दर्जाचे महान साहित्यिक होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. बाबुराव गुरव यांनी केले.

अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मराठी अधिविभाग व अण्णा भाऊ साठे अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने वि. स. खांडेकर भाषा भवनात 'अण्णा भाऊ साठे : वाङ्मय आणि विचारविश्व' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते.

डॉ. गुरव म्हणाले, साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांची लेखक म्हणून नोंद घेणारे शिवाजी विद्यापीठ हे राज्यातील पहिले विद्यापीठ आहे.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी वि. स. खांडेकर यांनी साहित्यरत्न अण्णा भाऊ यांच्याबद्दल लिहून ठेवलेले विचार सांगितले. याप्रसंगी 'अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ व मातंग समाज' या पुस्तकाचे लेखक उपकुलसचिव डॉ. उत्तम सकट, छत्रपती शाहू क्रीडा पुरस्कारप्राप्त दीपक पाटील यांचा सत्कार करण्यात आला. अध्यासनाचे समन्वयक डॉ.रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. राजेश पाटील यांनी आभार मानले.

यावेळी विदेशी भाषा अधिविभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे, प्रभारी हिंदी अधिविभाग प्रमुख डॉ. औदुंबर सरवदे, डॉ. प्रभंजन माने, डॉ.राजाराम गुरव, डॉ. अनमोल कोठाडिया, लोकशाहीर रणजित आशा अंबाजी कांबळे आदी उपस्थित होते.

2 AUG 2023 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य जागतिक दर्जाचे

## ज्येष्ठ साहित्यिक डॉ. बाबूराव गुरव यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात व्याख्यानाचे आयोजन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयायमी होते. साहित्यिक म्हणून त्यांच्या नावावर ३० कादंबऱ्या, २३ कथासंग्रह, एक नाटक, एक प्रवास वर्णन आणि दोनशे ते अडीचशे गाणी, लावण्या आणि १५ वगनाट्ये, तमाशा आहेत. त्याचबरोबर ते मोठे स्वातंत्र्यसैनिकही होते. लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांचे साहित्य जागतिक दर्जाचे होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. बाबूराव गुरव यांनी केले.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग आणि अण्णा भाऊ साठे अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. 'अण्णा भाऊ साठे: वाङ्मय आणि विचारविश्व' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. वि. स. खांडेकर भाषा भवना येथे झालेल्या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. दरम्यान कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रशासकीय इमारतीत अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त मार्गदर्शन करताना डॉ. बाबूराव गुरव. सोबत डॉ. उत्तम सकट, डॉ. नंदकुमार मोरे, कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि डॉ. रणधीर शिंदे.

डॉ. गुरव म्हणाले, स्वातंत्र्य लढ्यामध्ये अमरावतीत त्यांनी एक महिना तुरुंगवास भोगला. आण्णांचे कुटुंब १९३२ साली उदरनिर्वाहासाठी मुंबईला आले. १९३० साली त्यांनी पहिले गाणे गायले. साहित्यरत्न आण्णा भाऊ साठेंची लेखक म्हणून नोंद घेणारे शिवाजी विद्यापीठ हे पहिले विद्यापीठ आहे. विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या प्रयत्नातून आण्णांची 'फकीरा' ही कादंबरी विद्यापीठाच्या ग्रंथालयात ठेवण्यात आली. लेखक विश्वास पाटील यांचे आण्णांवर आधारित 'दर्दभरी दास्तान' हे फार उत्तम पुस्तक आहे. त्यांचे साहित्य जगातील २७ भाषांमध्ये आणि भारतातील १४ भाषांमध्ये अनुवादित झाले आहे.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शैक्षणिक सुविधा नसताना शिवाजी विद्यापीठाच्या परिक्षेत्रामधील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्यासारखी एखादी व्यक्ती उच्च प्रतीचे साहित्य निर्माण करते, हे आदर्शवत आहे.

याप्रसंगी 'अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ आणि मातंग समाज' या पुस्तकाचे लेखक व नॅक विभागाचे उपकुलसचिव डॉ. उत्तम सकट, छत्रपती शाहू क्रीडा पुरस्कारप्राप्त दीपक पाटील, भक्ती नाईक, शीतल पटले, अमोल देशमुख यांचा सत्कार करण्यात आला. अण्णा भाऊ साठे अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. राजेश पाटील यांनी आभार मानले. यावेळी डॉ. मेघा पानसरे, डॉ. औदुंबर सरवदे, डॉ. प्रभंजन माने, डॉ. राजाराम गुरव, डॉ. अनमोल कोठाडीया, लोकशाहीर रणजीत आशा अंबाजी कांबळे आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# विद्यापीठात कॅमेरा हँडलिंग विषयावर शनिवारी कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील एम. ए. मास कम्युनिकेशनच्या वतीने शनिवार ५ ऑगस्ट रोजी कॅमेरा हॅन्डलिंग या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले आहे. देहरादून येथील फोटोग्राफी इन्स्टिट्यूटमधील विराज चव्हाण विद्यार्थ्यांना कॅमेरा हाताळणीचे प्रशिक्षण देणार आहेत. दुपारी दोन वाजता हे प्रात्यक्षिक सुरू होईल. सर्वांसाठी हे प्रशिक्षण खुले असून विद्यार्थ्यांसोबतच फोटोग्राफीची आवड असणाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

लोकमत

# कॅमेरा हँडलिंगवर शनिवारी कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एम.ए. मास कम्युनिकेशनच्या वतीने शनिवारी कॅमेरा हँडलिंग या विषयावर कार्यशाळा होणार आहे. डेहराडून येथील फोटोग्राफी इन्स्टिट्यूटमधील विराज चव्हाण विद्यार्थ्यांना कॅमेरा हाताळणीचे प्रशिक्षण देणार आहेत. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या इमारतीमध्ये दुपारी दोन वाजता हे प्रात्यक्षिक सुरू होईल. सर्वांसाठी हे प्रशिक्षण खुले असून विद्यार्थ्यांबरोबर फोटोग्राफीची आवड असणाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात शनिवारी कॅमेरा हँडलिंग विषयावर कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशनच्या वतीने शनिवारी (दि.५) कॅमेरा हँडलिंग या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले आहे. देहरादून येथील फोटोग्राफी इन्स्टिट्यूटमधील कॉन्ट्रीब्यूटरी टीचर विराज चव्हाण विद्यार्थ्यांना कॅमेरा हाताळणीचे प्रशिक्षण देणार आहेत. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या इमारतीमध्ये दुपारी दोन वाजता हे प्रात्यक्षिक सुरू होईल. सर्वांसाठी हे प्रशिक्षण खुले आहे. विद्यार्थ्यांसोबतच फोटोग्राफीची आवड असणाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# विद्यापीठात कॅमेरा हँडलिंग विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या एमए मास कम्युनिकेशनतर्फे शनिवार, दि. ५ ऑगस्ट रोजी कॅमेरा हॅन्डलिंग या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले आहे. डेहराडून येथील फोटोग्राफी इन्स्टिट्यूटमधील कॉन्ट्रिब्युटरी टीचर विराज चव्हाण हे विद्यार्थ्यांना कॅमेरा हाताळणीचे प्रशिक्षण देणार आहेत. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या इमारतीमध्ये दुपारी २ वाजता हे प्रात्यक्षिक सुरू होईल.

लोकमत

# दूरशिक्षण केंद्राच्या प्रवेशासाठी ३१ पर्यंत मुदतवाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ची बी.ए., बी.कॉम, एम.ए.(मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम, एम.एस्सी (गणित) आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

डॉ. मोरे म्हणाले, जे विद्यार्थी अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत, ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे अशा विद्यार्थ्यांना दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या एकूण ८६ अभ्यासकेंद्रांत प्रवेशाची संधी मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थी, गृहिणी, कामगार,सैनिक, उद्योजक, शेतकरी, सरकारी कर्मचारी,खासगी कंपन्या आदींनी आपला प्रवेश निश्चित करावा. अपूर्ण शिक्षण पूर्ण करण्याची चांगली संधी दूरशिक्षण केंद्राच्यावतीने उपलब्ध झाली असून याचा लाभ घ्यावा.

2 AUG 2023 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात बॅ. बाळासाहेब खर्डेकर जयंती साजरी

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठात बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्रामध्ये बॅ. खर्डेकर यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, संचालक क्रीडा व शारीरिक शिक्षण डॉ. एस. वी. बनसोडे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. सचिनकुमार पाटील, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. डी. बी. सुतार, उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर आदी उपस्थित होते.

पुढारी

# 'दूरशिक्षण'च्या अभ्यासक्रम प्रवेशासाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ची बी.ए., बी.कॉम, एम.ए.(मराठी, हिंदी, इंग्रजी,समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम. कॉम, एम.एस्सी (गणित) आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेस विद्यार्थी हितास्तव ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती संचालक



प्रा.डॉ.डी.के.मोरे यांनी दिली. जे विद्यार्थी अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत, ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, अशा विद्यार्थ्यांना दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या ८६ अभ्यास केंद्रात प्रवेशाची संधी मिळणार आहे.

विद्यापीठाच्या www. unishivaji. ac. in या संकेतस्थळावर Distance Education लिंकवर प्रवेशाची जाहिरात उपलब्ध आहे. http:/// sukapps. unishivaji.ac. in/ studentregistration या ऑनलाईन लिंकवर प्रवेश निश्चित करावा. अधिक माहितीसाठी विद्यापीठातील मुख्य कार्यालय किंवा नजीकच्या अभ्यास केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तरच्या ६१२ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ६१२ अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर घोषित करण्यात आले आहेत.

विद्यापीठाच्या मार्च-एप्रिलच्या उन्हाळी सत्रातील अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. मंगळवारी बॅचलर ऑफ फार्मसी, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. परीक्षेला ३८० विद्यार्थी उपस्थित होते.

दरम्यान, १ ऑगस्ट रोजी एम.एस्सी. मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट, एम.ए. (अर्थशास्त्र), एम.एस्सी. (रसायनशास्त्र) आदी अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

2 AUG 2023 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण अभ्यासक्रम प्रवेशास ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ची बी.ए., बी.कॉम., एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम.कॉम, एम.एस्सी. (गणित) आदी अभ्यासक्रमांच्या प्रवेशास ३१ जुलैपर्यंत मुदत होती; मात्र विद्यार्थी हितास्तव गुरुवार, दि. ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.



डॉ. मोरे म्हणाले, जे विद्यार्थी अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत, ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, अशा विद्यार्थ्यांना दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या ८६ अभ्यास केंद्रांत प्रवेशाची संधी मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थी, गृहिणी, कामगार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, सरकारी कर्मचारी, खासगी कंपन्यांतील कर्मचारी आदींनी आपला प्रवेश निश्चित करावा.

शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेशाबाबतची जाहिरात उपलब्ध आहे. प्रवेशासाठी दि. ३१ ऑगस्टनंतर मुदतवाढ मिळणार नाही. जे विद्यार्थी नियमित महाविद्यालयात प्रवेशित झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीचाही लाभ मिळणार आहे. अधिक माहितीसाठी विद्यापीठातील मुख्य कार्यालयाशी अथवा नजीकच्या महाविद्यालयातील अभ्यास केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन संचालक डॉ. मोरे यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# विद्यापीठ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू आहेत. सोमवारी या ४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा विविध महाविद्यालयांमध्ये पार पडल्या. त्यास ३ हजार २१४ विद्यार्थी उपस्थित होते, तर दिवसभरात ८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले. सोमवारअखेर ६०५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आले आहेत. विद्यापीठाच्या परीक्षा प्रमाद समितीतर्फे कोल्हापूर जिल्ह्यात ६ व सातारा १ अशा ७ गैरप्रकारांची प्रत्यक्ष नोंद करण्यात आली आहे.

2 AUG 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



भोवताल

# पूर, महापूर आणि दरडी!

डॉ. व्ही.एन. शिंदे

यावर्षी पावसाने सुरुवातीला ताणून धरले, पण उशिराने महाराष्ट्रात पडू लागला. नंतर त्याने आपला हात सैल सोडला आणि महाराष्ट्रातही पूर आणि महापुराची स्पर्धा सुरू झाली. २०१९ आणि २०२१ साली महापुराने कोल्हापूर भागात थैमान घातले होते. त्यावेळची परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने यावेळी अतिरिक्त दक्षता घेतली. वेळीच लोकांना सुरक्षित स्थळी हलवले आणि प्रत्यक्षात मात्र पूर आला नाही. जिल्हा प्रशासनाने सुटकेचा निश्वास सोडला. हवामान खात्याने रेड ॲलर्ट दिला होता, त्याच दिवशी पावसाने आपला हात आखडता घेतला. विदर्भात मात्र महापुराने थैमान घातले. अनेक गावांना कवेत घेत पाणी समुद्राकडे जात राहिले.

यावेळच्या पावसामध्ये सर्वात मोठी घटना घडली, ती इर्शाळवाडीची. इर्शाळवाडी हे कोकणातील रायगड जिल्ह्यामध्ये डोंगररांगेवर वसलेले छोटेखानी गाव. अनेक वर्षांपासून सुखाने नांदत असलेले. या ठिकाणी येणाऱ्या गिर्यारोहकांना चहा, जेवण बनवून देणारे. त्यातून चार पैसे कमावणारे. सुखाचे जीवन जगत होते. १९ जुलैच्या मध्यरात्री या गावावर डोंगराचा कडा कोसळला. हे गाव अशा दुर्गम ठिकाणी वसलेले की तेथे पोहोचण्यासाठी, पाच किलोमीटरपर्यंत चालत प्रवास करावा लागतो. त्यामुळे बचाव कार्यासाठी एनडीआरएफच्या जवानांना पोहोचताना अडचणी आल्या. जखमींना दवाखान्यात नेण्यासाठी पायपीट करावी लागत होती. १००च्या आसपास घरे असणारे हे गाव. लोकसंख्या अवघी २२९. सर्वच घरे या दुर्घटनेत गाडली गेली. दुसऱ्या दिवसापासून बचाव कार्य सुरू झाले. तीन दिवस शोधमोहीम घेतल्यानंतर दुर्गंधी आणि पावसाच्या माऱ्यामुळे बचाव कार्य थांबवावे लागले. या दुर्घटनेत २७ जणांचा मृत्यू झाला, तर बचाव कार्य थांबवले तेव्हा, एकूण ७८ लोक बेपत्ता असल्याचे सांगण्यात आले. गावातील १२४ जण वाचले.

यापूर्वी अनेक ठिकाणी अशा दुर्घटना घडल्या. चेंबूरमध्ये दरड कोसळून २२ लोक मरण पावले होते. माळीण येथे कोसळलेल्या दरडीखाली अख्खे गाव गाडले गेले होते. तेथे गाव असल्याच्या खुणाही राहिल्या नव्हत्या. वेताळवाडीलाही असेच दरडीने झाकून टाकले. पन्हाळ्याची तटबंदी गतवर्षी ढासळली. विशाळगडावरही पडझड झाली. यावर्षीच्या पावसात हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये दरडी कोसळण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. तसेही मागील दहा वर्षांत दरड कोसळण्याच्या घटनांमध्ये १०० पट वाढ झाली आहे. रस्त्याच्या कडेला दरडी कोसळून होणारे अपघात आणि त्यात होणारे मृत्यू या बातम्या नित्याच्या झाल्या आहेत. २०११ मध्ये माधव गाडगीळ समितीने पश्चिम घाटाचा सखोल अभ्यास करून आपला अहवाल दिला आहे. त्यातील तरतुदींची अंमलबजावणी झालीच नाही. मात्र डोंगररांगांमध्ये मानवी हस्तक्षेप दिवसेंदिवस वाढत गेला आहे आणि निसर्ग त्यावर आपली प्रतिक्रिया देत राहिला आहे. वारंवार अशा घटना घडत असूनही मानवाने निसर्गातील हस्तक्षेप कमी केलेला नाही; तर तो दिवसेंदिवस वाढत आहे आणि त्यामुळेच दरड कोसळण्याच्या घटना वाढल्या आहेत. हे फक्त महाराष्ट्रातच नाही तर केरळपासून ते हिमालयापर्यंत सर्वदूर, संपूर्ण भारतात हीच परिस्थिती आहे.



डोंगररांगांतील महत्त्वाचा हस्तक्षेप आहे तो म्हणजे वृक्षतोड. भारतातील सर्वच राज्यांत जंगलांचे प्रमाण कमी होत आहे. झाडे तोडून काही ठिकाणी डोंगरमाथ्यावरही शेती करण्याचे प्रयत्न करण्यात आले. माळीणची दुर्घटना डोंगरमाथ्यावर शेती करण्यामुळे घडली असल्याचा निष्कर्ष निघाला. माळीणच्या शेजारी असणाऱ्या डोंगरावरील जमीन लागवडीखाली आणली होती. शेतीसाठी घालण्यात आलेल्या बांधामुळे पाणी साठले. त्यामुळे डोंगरावरील मातीमध्ये पाणी मुरले. माती सैल झाली आणि डोंगर कोसळला. ज्या कृषी अधिकाऱ्याचा डोंगरमाथ्यावर यशस्वी शेतीचा प्रयोग केल्याबद्दल सन्मान करण्यात आला होता, त्यालाच माळीण घटनेसाठी जबाबदार धरण्यात आले. निसर्गातील हस्तक्षेपाचा भविष्यात काय परिणाम होणार आहे, याचा विचार वेळीच केला नाही तर काय होते याचे हे उत्तम उदाहरण!

सह्याद्रीच्या डोंगररांगात तर आणखी एक वेगळ्या प्रकारचा हस्तक्षेप वाढला आहे. कोकणात खासगी मालकीचे अनेक डोंगर आहेत. त्यावर खासगी मालकीची जंगले होती. हे डोंगर धनिकांनी विकत घेतले. त्यावरील खासगी जंगले नष्ट केली गेली. डोंगररांगांवरील विविध प्रकारची नैसर्गिक वाढलेली वनसंपदा नष्ट करून ते सपाट करण्यात आले. त्या ठिकाणी हापूसची कलमे लावण्यात आली. हापूसची वाढ चांगली व्हावी म्हणून जमिनीवरील गवतही काढून टाकण्यात आले. त्यामुळे पूर्ण जमीन मोकळी झाली. मोठी घरे बांधण्यासाठीही झाडांची बेसुमार कत्तल होत आहे. डोंगररांगांमध्ये फार्म हाऊस बांधण्याचे वेड अलीकडे वाढले आहे. अशा घरांच्या बांधकामामुळे झाडांची होणारी कत्तल हा चिंतेचा विषय आहे. अशा डोंगररांगांतील घराकडे जाण्यासाठी रस्ता करताना पुन्हा तेथील मूळ रचनेला बाधा पोहोचवली जाते.

झाडे तोडल्यामुळे आणि गवत काढून टाकल्यामुळे मातीला पकडून ठेवणारी मुळे मृत पावतात. त्यामुळे पावसाच्या पाण्याबरोबर माती वाहू लागते. डोंगराचा पृष्ठभाग हळूहळू पाण्यामध्ये विरघळत जातो. ती माती खाली वाहून जाते. नदीपात्रात जमा होते आणि नदीचे पात्र उथळ बनत जाते. त्यामुळे पूर येताच पाणी पात्राबाहेर पडून पसरू लागते. एकीकडे डोंगरमाथे उघडे झाल्याने त्यावर असणारी मृदा वाहून जाते, तर दुसरीकडे नद्यांना थोड्या पावसातही पूर यायला सुरुवात होते. पावसाचे पाणी थोडेफार जमिनीत मुरते, तेही यामुळे पूर्णतः थांबते आणि उन्हाळ्यात वाहते असणारे झरे आटून जातात. पावसाळ्यात पूरस्थिती; तर उन्हाळ्यात पाणीटंचाई असे विरोधाभासी चित्र दिसते.

रस्त्याच्या बांधकामाचा निसर्गाला मोठा फटका बसत आहे. आज जलद प्रवास प्रत्येकाला हवा असतो. रस्त्यावर वेळ घालवणे नको असते. त्यासाठी डोंगर फोडून किंवा डोंगरामध्ये भुयार काढून कमी अंतराचे, मोठे रस्ते बांधण्याचे आणि त्याचे जाळे करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सह्याद्रीपासून हिमालयापर्यंत सर्वच डोंगरांना असे पोखरण्याचे कार्य सुरू आहे. संरक्षणापासून जनतेच्या सोयीसाठी हे आवश्यकही आहे. ही रस्त्याची कामे करत असताना अवजड यंत्रांचा वापर मोठ्या प्रमाणात होतो. जुना पुणे-मुंबई रस्ताही सह्याद्रीच्या पर्वतरांगांना ओलांडून जाणारा. या रस्त्यावर दरडी कोसळण्याचे प्रमाण हे अत्यल्प आहे. याचे कारण हा रस्ता बांधताना किमान यंत्रांचा वापर झाला होता. त्या काळाच्या तुलनेत आज पोकलेन, जेसीबीसारखी मोठी यंत्रे आली आहेत. ही यंत्रे वापरून काम गतीने पूर्ण होते. मात्र त्यांच्या हादऱ्याने संपूर्ण परिसर खिळखिळा करते. पाऊस पडू लागला की पाणी भेगामध्ये जाते आणि दरडी रस्त्यावर कोसळतात. म्हणून निसर्गात किमान हस्तक्षेप न करता, जल-जंगल-जमिनीचा समतोल राखणारा विकास आवश्यक ठरतो.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००

2 AUG 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात बॅ. बाळासाहेब खर्डेकर जयंती

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्रामध्ये खर्डेकर यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून खर्डेकर जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, संचालक क्रीडा व शारीरिक शिक्षण डॉ. एस. वी. बनसोडे, डॉ. नंदकुमार मोरे, रणधीर शिंदे, सचिनकुमार पाटील, खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. डी.बी. सुतार, उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर, सहाय्यक ग्रंथपाल डॉ. एस. व्ही. थोरात आदी उपस्थित होते.

2 AUG 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील 'दूरशिक्षण'च्या प्रवेशासाठी मुदतवाढ

कोल्हापूर, ता. १ : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ची बी.ए.,बी. कॉम, एम.ए.(मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम. कॉम, एम.एस्सी (गणित) आदी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. विद्यार्थी हितास्तव ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

जे विद्यार्थी अजूनही शिक्षणापासून वंचित आहेत, ज्यांचे शिक्षण अपूर्ण आहे, अशा विद्यार्थ्यांना दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राच्या एकूण ८६ अभ्यासकेंद्रांत प्रवेशाची संधी मिळणार आहे.



त्यामुळे विद्यार्थी, गृहिणी, कामगार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, सरकारी कर्मचारी, खासगी कंपन्या आदींनी आपला प्रवेश निश्चित करावा. विद्यापीठाच्या (www.unishivaji.ac.in) या संकेतस्थळावर (Distance Education) लिंकवर प्रवेशाबाबतची माहिती उपलब्ध आहे. निर्धारित मुदतीमध्ये प्रवेश घ्यावा. त्यानंतर मुदतवाढ मिळणार नाही. जे विद्यार्थी नियमित महाविद्यालयात प्रवेशित झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना दुहेरी पदवीचाही लाभ मिळणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रातील विविध अभ्यासक्रमांना प्रवेशित व्हावे. अधिक माहितीसाठी विद्यापीठातील मुख्य कार्यालयाशी अथवा नजीकच्या महाविद्यालयातील अभ्यास केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन संचालक प्रा. मोरे यांनी केले.

तरुण भारत

# दूरशिक्षण, ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या प्रवेशासाठी मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राची शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ची बी. ए., बी. कॉम, एम. ए.(मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास), एम. कॉम, एम. एस्सी (गणित) आदी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेस ३१ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. अद्याप ज्यांनी प्रवेश घेतला नाही, अशा विद्यार्थ्यांना ८६ अभ्यास केंद्रांवर प्रवेश घेता येणार आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर Distance Education लिंकवर प्रवेशाबाबतची जाहिरात उपलब्ध आहे. तरी विद्यार्थ्यांनी http//sukapps.unishivaji.ac.in/studentregistration/#/ या ऑनलाईन लिंकवर प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन संचालक डॉ. डी. के. मोरे यांनी केले आहे.